# प्रकरण-९  (मॅन्युअल -आठ)

पदोन्नती, पर्यवेक्षण आणि जबाबदा-या यांसह निर्णयाच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती.

हे कार्यालय आस्थापनाविषयक प्रस्ताव, बृहन्मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम, मुंबई महानगरपालिका निवृत्तीवेतन नियम, इतर सेवा शर्ती यामधील सुधारणांचे प्रस्ताव, महानगरपालिका कर्मचा-यांच्या वेतनश्रेणी आणि भत्ते यामधील सुधारणा, महानगरपालिकेच्या विविध खात्यांमधील हंगामी पदे पुढे चालू ठेवणे याविषयीचे प्रस्ताव यांची छाननी करीत असते आणि सदरचे प्रस्ताव उप आयुक्त/अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त/महानगरपालिका आयुक्त/पद निर्मिती समिती यांच्या मंजुरीसाठी/मान्यतेसाठी सादर करीत असते. अशाप्रकारे या बाबतीतील निर्णय वरिष्ठ पातळीवर घेण्यात येतात.